वार्ताहर · मुंबई
बुधवार, २४ मे २०१७

# थोडक्यात

## इंडियन डेंटल असोसिएशनतर्फे जनजागृती अभियान

मुंबई, दि. २३ - इंडियन डेंटल असोसिएशन (आयडीए)ने तंबाखुसेवनाचे दुष्परीणाम नमूद करणारी आणि युवकांवर लक्ष केंद्रीत करणारी एक मोहीम हाती घेतली आहे. याद्वारे मदरशांच्या विद्यार्थ्यांपर्यंत ही मोहिम राबवण्यात येणार आहे. आयडीएने मालाड येथील मालवणीमधील मदरसा जामिया अर्बिया मिन्हाजुल सुन्नाह येथे नुकतेच पहिले प्रात्यक्षिक दाखवले आणि बैठक घेतली. या बैठकीमध्ये आयडीएचे मानद सरचिटणीस डॉ. अशोक ढोबळे आणि त्यांच्या चमूने मदरशातील शिक्षकांबरोबर युवा विद्यार्थ्यांना मौखिक आरोग्याचे महत्त्व पटवून दिले. त्याचबरोबर तंबाखूमुळे होणाऱ्या तोंडातील दुर्गंधी आणि इतर रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय सांगितले गेले.